1231 o/c

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो. पु. प्रा — निश्चयेन परिवर्तनम्। — झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र (पुनर्वसन घटकाकरीता)

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/अंभोप्र/मा.क्र.२०१/६९३/२०२४
दि. ०७/०३/२०२४.

वाचा- १) मूळ मंजूर बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा/६९५ दि.१९/०४/२०१८.
२) सुधारित बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा / १०६०/२०२० दि.१४/०९/२०२०.
३) सुधारित बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा /२३४२/२०२१ दि.३१/१२/२०२१.
४) सुधारित बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा / ११५५/२०२२ दि.१८/०८/२०२२.
५) सुधारित बांधकाम परवानगी क्र. झोपुप्रा/१९१९/२०२३ दि.१६/१०/२०२३.
६) विकसकाचा दि.११/१२/२०२३ रोजीचा भोगवटासाठी प्रस्ताव.
७) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि.१९ /०१/२०२४.
८) विकसकांचे दि. ०२/०२/२०२४ रोजीचे पत्र.

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department ★ APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

---

पुणे पेठ, शिवाजीनगर, शिरोळे प्लॉट, फा.प्लॉ.क्र.४८७/७, सि.स.नं. ११०८/७, गणेशखिंड रोड, भांबुर्डा येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे दि.१६/१०/२०२३ रोजी सुधारित बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आली आहे. मंजूर बांधकाम परवानगीप्रमाणे इमारतीमधील पुनर्वसन घटकाचे बांधकाम पूर्ण झाल्याने योजनेचे विकसकानी पुनर्वसन इमारतीसाठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्राची मागणी केली आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. १९/०१/२०२४ रोजी भोगवटा प्रमाणपत्रासाठी मान्यता दिलेली आहे.

मंजूर बांधकाम नकाशानुसार पूर्ण झालेल्या पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मजले | मंजूर नकाशानुसार पुनर्वसन घटक | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|
| | | Resi. | Comm. | |
| १) | ग्राउंड लेवल -१ | पार्किंग | दुकान क्र. १ ते ८ | ८ दुकाने + पार्किंग |
| २) | पहिला | सदनिका क्र. | -- | ०३ सदनिका + ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १०१ ते १०३ + ०१ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर + ०१ व्यायाम मंडळ + टॉयलेट | | बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर + ०१ व्यायाम मंडळ + टॉयलेट |
| ३) | दुसरा ते सातवा, नववा ते दहावा | सदनिका क्र. २०१ ते २०६, ३०१ ते ३०६, ४०१ ते ४०६, ५०१ ते ५०६, ६०१ ते ६०६, ७०१ ते ७०६, ९०१ ते ९०६, १००१ ते १००६, | -- | ०६ सदनिका मजलानिहाय |
| ४) | आठवा (Refuge Area) | सदनिका क्र. ८०२ ते ८०६ + Refuge area | -- | ०५ सदनिका |
| १२) | अकरावा | सदनिका क्र. ११०१ ते ११०३,११०६ | | ०४ सदनिका |
| एकूण | | ६० | ०८ | ६८ सदनिका |

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

पुनर्वसन घटक सदनिका :-
निवासी सदनिका :- ६० सदनिका
बिगर निवासी सदनिका:- ०८ दुकान गाळे

एकूण :- ६० सदनिका + ०८ दुकानगाळे + १ बालवाडी + १ वेलफेअर सेंटर + १ सोसायटी ऑफिस + टॉयलेट + ०१ व्यायाम मंडळ + पार्किंग

योजनेमधील इमारतीच्या बांधकामासंबंधी आर्कीटेक्ट यांनी दिलेले पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व विकसक यांनी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व हमीपत्राचे आधारे खाली नमूद अटी व शर्तीस अधीन राहून पुनर्वसन इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी व शर्ती :-

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर, सदर इमारतीमध्ये पूर्व परवानगीशिवाय बांधकाम केल्यास बांधकाम अनधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार कारवाई करण्यात येईल.
२) भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.
३) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तीचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

1229

४) मंजूर बांधकाम नकाशानुसार इमारती सभोवतीची सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open spaces) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

५) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

६) योजनेने बाधित रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करून त्याबाबतची कागदपत्रे योजनेतील इमारतीचे अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मागणीपूर्वी, दाखल करणे आवश्यक राहील. तद्नंतर योजनेचा अनुज्ञेय होणारा टीडीआर अदा केला जाईल.

७) योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदीनुसार सोडत पद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

८) योजनेकरिता विकसकांनी सादर केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रानुसार मनपाचा पाणी पुरवठा विभागाकडून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुस्थितीत राहील, याची दक्षता सदनिका हस्तांतरण करणेपूर्वी विकसकाने घ्यावी.

९) सदर इमारतीच्या बांधकामा संदर्भात कोणतीही समस्या उद्भवल्यास नियमावलीनुसार ५ वर्षापर्यंत देखभाल दुरूस्तीची (AMC) सर्वस्वी जबाबदारी विकसकांची राहील.

१०) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची, खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळून आल्यास सदर भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

प्र. सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे.

प्रत :- १) विकसक मे. नाईकनवरे बिल्डकॉन प्रा. लि. १२०४/४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-४२.

२) आर्कि. जी. एच. नाईकनवरे १२०४/४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे - ४२.

३) तहसिलदार, ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४) संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना प्रमाणपत्र संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.